# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी २२६१७९६९ फॅक्स — २२६९०००७

E-mail : desk18@ dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**Web Notification**

का.क्र. :१८/तंशिसं/संस्था-पत्र/२०१७/२८

दिनांक :- २७/०२/२०१७

प्रति,

सर्व संबंधित विद्यार्थी / प्राचार्य,

विषय :- **राज्य शासनाची अल्पसंख्याक विद्यार्थ्यासाठी शिष्यवृती योजना सन २०१६-१७ च्या अर्जामध्ये भरलेल्या आधारकार्डबाबत...**

राज्य शासनाच्या अल्पसंख्याक शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलालाईन अर्जामध्ये बँकखाते (Bank Name, IFSC Code, A/c No.) व आधारकार्ड नंबर, पासबुक व आधारकार्डची स्कॅन कॉपीसह अपलोड करुन भरण्यात आले. तसेच संस्थेने आपला लॉगिन आयडी व पासवर्ड वापरुन त्या संस्थेमधून विद्यार्थ्यांची अर्जामध्ये भरलेल्या सर्व माहितीची (नाव, बँक खाते, आधारकार्ड नंबर इ.) तपासणी करुन अर्ज मंजूर / नामंजूर करण्यात आले.

**संस्थांकडून तपासणी करुन देण्यात आलेल्या काही विद्यार्थ्यांचे बँक खाते व आधारकार्ड तपशिलामध्ये तफावत** (आधारकार्डवर प्रिंट असलेले नांव व ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या नांवात फरक / जन्मतारिख / जेंडर) **आढळून आली.**

ज्या विद्यार्थ्यांच्या आधारकार्ड तपशिलामध्ये तफावत आढळून आली आहे अशा सर्व विद्यार्थ्यांची संस्थानिहाय यादी संबंधित संस्थांना त्यांच्या लॉगिन आयडी च्या Institute Panel मध्ये “Updation of Aadhaar details” अंतर्गत देण्यात आलेली आहे. संस्थांनी असे सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड नंबर पुनर्तपासणी करुन व आधारकार्डची स्कॅन कॉपी अपलोड करुन दि.१० मार्च, २०१७ पर्यंत Confirm/Update करावे व सिस्टीमद्वारे प्राप्त होणारी ऑनलाईन Report ची स्कॅन कॉपी (प्राचार्यांच्या नांव, सही व शिक्क्यासह) **दि. १५ मार्च,२०१७** पर्यंत ऑनलाईन अपलोड करावी, जर पुनर्तपासणी करुन दिलेल्या आधारकार्ड तपशिलामध्ये परत तफावत आढळून आली **तर या शिष्यवृत्ती संबंधातील कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.**

**टिप:** विद्यार्थ्याने आपला आधारकार्ड नंबर त्यांच्या इतर खात्याशी संलग्न न करता विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेल्या बँक खात्याशी संलग्न करावा व याबाबत संस्थांनी सर्व विद्यार्थ्यांना सूचित करावे. संस्था / विद्यार्थ्यांनी सांकेतिक स्थळः www.dtemaharashtra.gov.in/scholarships वर देण्यात आलेले “Check Your Aadhaar No. (UID No.) is linked with Bank A/C or Not” द्वारे किंवा *99*99# हा क्रमांक मोबाईल फोनद्वारे डायल करुन आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न / लिंक्ड आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी. जर आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न / लिंक्ड नसेल तर विद्यार्थ्यांनी बँकेत जाऊन आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न/ लिंक्ड करुन घ्यावे व वरील देण्यात आलेल्या सुविधेद्वारे खात्री करुन घ्यावी.

( डॉ. सुभाष महाजन )

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई.

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती यांना माहितीसाठी.